# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**विशेष महासभा दि. ३०/०३/२०११**

आज बुधवार दि. ३०/०३/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १३ दि. १७/०३/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | पाटील मिलन गोविंदराव | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| २१) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २२) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २५) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २६) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २७) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २८) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २९) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| ३०) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| ३१) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३२) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३३) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३४) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३५) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४९) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५०) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५१) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५४) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६७) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६८) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६९) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७०) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ७१) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ७५) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| २) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ४) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ५) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. ३०/०३/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. १३, दि. १७/०३/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

महापौर साहेब, मला एक शुभेच्छा द्यायची आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सन २०१० चे सुधारीत व २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करण्यासाठी मा. स्थायी समितीचे सभापती स्टिवन मेंन्डोंसा यांना डायसवर आमंत्रित करतो आहे. त्यांनी बजेटची एक प्रत महापौरांना सादर करतील. कृपया त्यांनी वर यावे. शिक्षण मंडळाचं अंदाजपत्रक मा. सभापती मा. महापौरांना सादर करतील. परिवहनचं अंदाजपत्रक मा. सभापती सादर करत आहेत. शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक मा. सभापती मा. महापौरांना सादर करत आहेत.

**मा. सभापती (स्थायी समिती) :-**

सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सन्मा. सभागृहनेते, विरोधी पक्षनेते, मा. आयुक्त, उपायुक्त, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका बंधु आणि भगिनींनो मनपा अधिकारी व कर्मचारी इथे उपस्थित नागरीक व पत्रकार बंधू मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. सचिव साहेब पुढचे वाचन तुम्ही करा.

**नगरसचिव :-**

सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सन्मा. सभागृहनेते, विरोधी पक्षनेते, मा. आयुक्त, उपायुक्त, सन्मा. नगरसेवक, नगरसेविका बंधु आणि भगिनींनो मनपा अधिकारी व कर्मचारी इथे उपस्थित नागरीक व पत्रकार बंधुनो.......

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

मा. आयुक्त यांनी दि. ०१/०३/२०११ रोजी मा. स्थायी समितीला अंदाजपत्रक सादर केले होते. त्यावर दि. ०३/०३/२०११ ते ०५/०३/२०११ पर्यंत अंदाजपत्रकावर चर्चा करुन अंदाजपत्रकात उत्पन्नाकडे वाढ सुचविण्यात आली असून त्यानुसार खर्च विकास कामांवर विभागण्यात आलेला आहे. चर्चेमध्ये मा. स्थायी समितीचे सर्व सदस्यांनी विचार विनिमय करुन आवश्यक त्याठिकाणी सुधारित व मुळ अर्थसंकल्पात काही दुरुस्त्या/सुधारणा करुन एकमताने अंदाजपत्रक दि. ०७/०३/२०११ रोजी स्विकारले आहे. यावर्षी शिक्षण मंडळाचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये शालेय विकास/सुधारणा याकडे लक्ष पुरविण्यात आलेले आहे.

**अंदाजपत्रक "अ" + "ब" + "क" + वृक्षप्राधिकरण + शिक्षण मंडळ + JNNURM + अंध व अपंग + P बजेट + महिला व बालकल्याण अंदाजपत्रक** यातील अपेक्षीत उत्पन्न खर्च व अखेरचे शिल्लकेचा गोषवारा अंदाजपत्रकात जोडण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पात जे प्रकल्प/योजना हाती घेण्यात येणार आहेत. त्यांची वेळीच अंमलबजावणी होण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. मा. स्थायी समितीने नमुद केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीचा विचार करुन सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकास एकमताने मंजुरी मिळावी ही विनंती.

हा अर्थसंकल्प तयार करताना मा. आयुक्त, मा. स्थायी समितीचे सर्व सदस्य, मुखलेखाधिकारी, सचिव, सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांनी जे मला मोलाचे सहकार्य केले त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

धन्यवाद!

सहकार्याबद्दल आभार.

**शरद पाटील :-**

महापौर साहेब मला परवानगी द्या.

**नगरसचिव :-**

शिवसेनेचे प्रशांत पालांडे ह्यांची कोकण आयुक्ताच्या पत्राने शिवसेनेचे गटनेते आज नियुक्ती झाली असल्याचे म्हणून नियुक्ती झाल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. सर्वांना माहिती द्या.

**शरद पाटील :-**

महापौर साहेब, देशात आणि जगभरात क्रिकेटची धुम चाललेली आहे आणि त्यांना सर्व देशवासियांनी आणि जगभरातुन सगळे शुभेच्छा देतात. आपण मिरा भाईंदर तर्फे शुभेच्छा द्यायच्या आहेत म्हणून आपल्या परवानगीने त्यांना शुभेच्छा देऊ इच्छितो. वर्ल्डकपच्या आज उपांत्य फेरीचा सामना पाकिस्तान वर्सेस हिंदुस्थान असा रंगणार आहे. त्यामध्ये हिंदुस्थानला विजय मिळावा म्हणून सगळीकडे यज्ञ, हवन होत आहे. आपण आपल्या सभागृहातर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा देत आहोत. तसेच क्रिकेट जगतामध्ये ज्याला देव मानलं जात असा सचिन तेंडुलकर ह्यांच्या शतकाचे शतक आज पूर्ण होईल अशा शुभेच्छा त्यांना देतो आणि सर्व मिरा भाईंदर वासियातर्फे आणि या सभागृहातर्फे शुभेच्छा देतो आणि सगळ्यांनी टाळ्यांच्या स्वागतात त्यांच्या शुभेच्छा स्विकार कराव्या अशी मी सर्वांना विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

या शुभेच्छाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेबने सुचना की भारत-पाकीस्तान का मैच है और इसमे भारत विजयी होना चाहीए यह सभी नगरसेवकोंकी, सदनकी और पुरे शहर की भावना है। मै सभी सदस्योंसे विनंती करता हूँ की आज हमारे बजेट की मिटींग है और भारत पाक का सेमीफायनल का मैच होनेवाला है सभी सदस्य इस बजेट को मा. सभापती स्थायी समिती के सदस्योंने पारित किया है उसको बिना चर्चा और बिनाविरोध के जल्दी पारित करे ताकी हम यह मैच का आनंद उठा सके।

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आपण जो अजेंडा दिलेला आहे त्याच्यामध्ये एखादी माझी माहिती चुकत असेल तर ह्याच्यात मुळ बजेट आहे त्याला पहिली मंजूरी दिलेली आहे. नंतर परिवहन आणि बाकी नंतर ठेवलेले आहेत म्हणजे एकदा मुळ बजेट मंजूर झाल्यानंतर बाकी बजेटमध्ये काय बदल आला तर मुळ बजेटला महत्व राहत नाही. माझ्या मते आपण जे दुसरे बजेट आहेत ते घेतले आणि नंतर मुळ बजेट घेतले तर त्याच्यामध्ये ज्या काही सुचना असतील सभागृहाची त्याच्यामध्ये समावेश करता येणार नाही तर आपण मुळ बजेटला मान्यता देणार आणि नंतर काय बदल झाला तर त्या मुळ बजेटच्या ठरावाला मान्यता राहणार नाही. मुळ बजेट शेवटला घ्यावं.

**नगरसचिव :-**

सभागृहाच्या सुचनेप्रमाणे प्रथम प्रकरण क्र. १११ चे वाचन करतो. प्रकरण क्र. १११, मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३३, ठराव क्र. १२१)

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, काल महानगरपालिकेतर्फे सर्वांना बजेट संदर्भात एक बॅग देण्यात आली त्यामध्ये एक पत्रिका पण आली. मग हा कार्यक्रम महापालिकेचा आहे का?

**मा. आयुक्त :-**

नाही, त्या ट्रस्टने विनंती केली म्हणून बॅगेतून पाठवली.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मागच्या वेळेला असे झाले होते.

**मा. आयुक्त :-**

ट्रस्टने विनंती केली की, आमच्याकडे स्टाफ नाही आणि बॅग जाणार आहे म्हणून पत्रिका पाठवली आणि ते ब्रम्हदेवाचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्याबाबत माझे काही म्हणणे नाही. आपल्या मा. उपमहापौरांनी मागच्या वेळेस सुचना केली होती अशाप्रकारची अधिका-याने काम करु नयेत कारण ते संस्थेचे आहे म्हणून मी आपले नजरेखाली आणले.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सन्मा. नगरसेवक आणि माजी महापौर मिरा भाईंदर वासियांचं अतिशय जागृत दैवत आणि खास करुन जी जूनी लोकं इकडे आहेत खासकरुन शेतकरी आमच्या इकडचा ब्रम्हदेवाचे दर्शन घेतल्याशिवाय कुठलही काम करत नव्हता. कुठलीही वरात ब्रम्हदेवाला मान दिल्याशिवाय जात पण नव्हती आणि येत पण नव्हती. त्या मंदीराचं जिर्णोध्दार करण्याची प्रमुख भुमिका माझी आहे. ह्याच्यामुळे अनेक दानशुर व्यक्ती आपल्याला भेटलेल्या आहेत त्यांच्या माध्यमातून हे मंजूर होते. पत्रिका आपल्या सगळ्यांना निमंत्रण दिलेले आहे. मी आशा करतो की आपण सर्वांनी तिकडे यावे. त्या देवतेच्या भुमिपुजनाला आपण यावे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही तुमच्या शब्दाला मान देतो. मागे तुम्ही म्हंटले होते. सुचना केली होती........

**भगवती शर्मा :-**

महापौर साहेब, सन्मा. सदस्यांनी जी सुचना केली वही सुचना इसी सदन के अंदर हुई थी। लेकीन वो क्यो हुई थी। वो विशेष व्यक्ती खास करके आपके द्वारा पद का दुरुपयोग किया जा रहा था। और यहॉपे एक चॅरीटेबल ट्रस्ट है इससे सदन से कोई लेना-देना नही है।

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२१, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

आकडे लाखात

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 224.10 | 224.00 |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 128.40 | 430.90 |
| एकूण खर्च | 351.50 | 654.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**मिलन पाटील :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

हा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर साहेब, ह्या वृक्षप्राधिकरणामध्ये आपण जर मागच्या ठरावामध्ये बघितलं. भाईंदर शहरामध्ये १५ हजार झाडं ही आपण जगवा आणि पैसे घ्या म्हणजे काही ठेकेदाराला दिलेले आहेत आणि त्या ठेकेदारानी तीन वर्षामध्ये किमान ७ ते ८ फुट उंच करुन महापालिकेला हस्तांतरण करायच आणि त्या हिशोबाने त्याला पैसे द्यायचे आहेत. वृक्षप्राधिकरणमध्ये सर्वात मोठी गोष्ट वृक्ष लावण्याची आहे. आपण ती ठेका पध्दतीने दिलेली आहे. मिरा भाईंदरची सर्व उद्यान सुशोभित आहेत. फक्त लाल माती आणि खतपाणी टाकायला फक्त काही मजुर लागतात. तशी माणसे आपल्या आस्थापनेमध्ये आहेत परंतु आपण बजेटमध्ये बघितलं तर एकशे एक कोटी तीस लाख रुपये तरतुद केलेली आहे. मागच्या वेळेला ती तरतुद फक्त ९० लाख होती आणि ३० लाख फक्त खर्च झालेला आहे. आता एक कोटी ३० लाख रुपये तरतुद करण्याचे प्रयोजन काय आहे? वृक्ष जनगणनेमध्ये आपण २० लाख मागच्या वेळेला वृक्ष गणना झालेली नाही. २००५ ला वृक्ष गणना झाली होती. त्यानंतर आता २०११ चालू आहे. सहा वर्षात वृक्ष गणना झाली नाही. आतापर्यंत महापालिकेने माझ्या माहितीप्रमाणे एकंदर महापालिकेच्या फंडातून किमान ५० हजार वृक्ष लावलेली आहे. किती जिवंत आहे, किती मेलेली आहे त्याची अजून गिणती झालेली नाही. त्याच्यासाठी आपण २० लाखाची तरतूद केलेली आहे. या २० लाखामध्ये प्रयोजन आपण केलेलं आहे. महापालिकेने या बजेटमध्ये जास्त तरतुद केली पाहिजे. कारण वृक्षगणना ही झाली पाहिजे. नियमाप्रमाणे वृक्षगणना झाली नाही तर शहरामध्ये किती हरीयाली आहे. किती प्रदुषण आहे त्याची आपण माहिती घेऊ शकत नाही. आपण जी तुळशी वाटपाचा कार्यक्रम ठरवला होता. प्रत्येक वर्षी आपण सांगतो या शहरामध्ये महापालिकेचे शिकणारे नऊ हजार विद्यार्थ्यांना आपण प्रत्येक वर्षी पर्यावरणाच्या दिवशी आपण तुळशी वाटपाचा कार्यक्रम करु. एक दोन वेळा आपण फक्त ५० ते १०० मुलांना आपण वृक्षवाटप करुन आपण तो देखावा म्हणून कार्यक्रम केलेला आहे. नऊ हजार मुलांना वृक्षांची जाणीव व्हावी म्हणून तुळशीच्या वाटपचा कार्यक्रम आपण केलेला आहे. तुळशी वाटपाच्या कार्यक्रमामध्ये आपण किमान २० लाख रुपये तरतुद आपण करावी. ही माझी वृक्षप्राधिकारणामध्ये सुचना आहे. या तीन वर्षाच्या १ कोटी ३० लाखाची तरतुदीचे प्रयोजन काय?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब आपण मागच्या वेळेला ज्या तीन ठेकेदारांना पंधरा हजार झाड लावण्याचं आणि जगवण्याचं जे टेंडर दिले होते त्याप्रमाणे झाडे लावली. आणि वृक्ष कमिटीच्या सर्व सदस्यांना झाडें दाखवून मोजून मग पेमेंट केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, मी पेमेंटचं सांगत नाही आपण २९ लाखाची तरतुद केलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

आणि ९० लाख खर्च झाले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी फक्त मजूर पुरवठा सांगतो. मजूर पुरवठ्यामध्ये तुम्ही जे ५० लाख रुपये वाढलेले तरतुद केलेली आहे. ते ५० लाख आपण ठेके पध्दतीने देतो. आपल्या उद्यानाचे सुशोभिकरण चांगले आहे. माती आणि खतपाण्यासाठी फक्त मजूराची आवश्यकता लागते तर ही रक्कम एक कोटी ३० लाख रुपये होण्याचं प्रयोजन काय आहे मजुर का जास्त पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मजूर तेवढेच आहेत पण किमान वेतन कायद्याप्रमाणे रक्कम तिथे कायद्याने वाढली. किमान वेतन कायद्याने मजूरीचे रेट वाढले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किमान वेतन कधी सुरु झालं.

**मा. आयुक्त :-**

आता नविन आले ना दर वाढलेले पुस्तक देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पुस्तकाची गरज नाही. किमान वेतन किती झाले ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

१६३ वरुन २३३ रुपये एका व्यक्तीचे

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण ह्याच्यामध्ये टोटल किती मजूर घेणार एक कोटी तीस लाख मध्ये आपण किती मजूर पकडलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

साहेब १६४ वरुन मजूरी २३३ झाली. त्याप्रमाणात आम्ही रक्कम वाढवून धरली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या वेळेला तुम्ही किती मजूरी घेतली.

**चंद्रकांत मोदी :-**

विषय पास हो गया दुसरा विषय घ्या.

**मा. आयुक्त :-**

१४०

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

१४० मजूर आपण वर्षभरामध्ये

**मा. आयुक्त :-**

जसे गार्डन वाढतात तसे मजूर वाढतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, अजून गार्डन वाढले नाहीत ना?

**मा. आयुक्त :-**

काम चालू आहे ना. आता भट मॅडमच्या वॉर्डमध्ये नविन गार्डनचं काम झालं. त्यानंतर चौपाटी वाढवली बाल उद्यान मिरारोडला एक काम चालू आहे. जसे गार्डन वाढतील तसे मजुर वाढतील आणि हिशोब महासभेत मिळेल.

**मिलन पाटील :-**

वृक्षप्राधिकरणाचे बजेट झालेले आहे. ठाण्याला वृक्षप्राधिकरणाचे प्रदर्शन भरले होत त्यामध्ये आपल्याला अनेक बक्षिसं मिळाली आहेत. मी आयुक्त, उपायुक्त, अधिक्षक मेश्राम, अधिक्षक इरकर त्यांना ठाण्याला जाऊन सात बक्षिसे मिळाल्याकारणाने त्यांचे मी अभिनंदन करतो. आणि सर्व सभा त्यांच अभिनंदन करते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वृक्ष गणनेमध्ये २० लाख रुपये होईल का? बजेटवर चर्चा करणारे अधिकारी असं बोलता.

**नागेश इरकर :-**

मा. वृक्षप्राधिकरणाने वृक्षगणनेला मंजूरी दिलेली आहे. वृक्षप्राधिकरणाचं टेंडर काढलेले आहे आता ते स्टँडींगला द्यायचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते कधी देणार तुम्ही ते पुढच्यावर्षी की ह्यावर्षी कधी देणार हे ह्यावर्षी तरतुद केलेली आहे. तुम्ही टेंडरपण काढला.

**नागेश इरकर :-**

ते टेंडर आता स्टँडींगला द्यायचं आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता कसं देणार आपलं आर्थिक वर्ष संपल

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, पाच वर्षातुन एकदा वृक्ष गणना होते. मागच्या वेळेला केलेलं आणि लेट झाले तर वृक्षगणनेमध्ये काय फरक पडणार नाही.

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, आज आपली बजेटची मिटींग आहे आणि उपायुक्त गैरहजर आहेत ही शरमेची गोष्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही आता उपायुक्तांना अभिनंदन दिलं.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, युनिक आयडेन्टी कार्ड संबंधी चीफ सेक्रेटरी यांचा व्हीडीओ कॉन्फरन्स कलेक्टर ऑफिसला आहे. कुठल्या कुठल्या केंद्रात आपले आयडेन्टी कार्ड प्रेस करण चालू आहे. त्याचा हिशोब देण्यासाठी चीफ सेक्रेटरीकडे व्हीडीओ कॉन्फरन्सला कलेक्टर ऑफिसर कडे पाठवलेले आहे.

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब, स्टँडींग मध्ये एक ठराव झालेला होता की, ट्री गार्डला प्रत्येक ठेकेदाराचे वेगवेगळे रंग असायला पाहिजे त्याची अंमलबजावणी झाली आहे का?

**नागेश इरकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने सदर पिजं-याची फक्त डिझाइन बदलायचा ठराव झाला होता.

**शरद पाटील :-**

डिझाईन नाही त्यांचे रंगपण बदलून घ्या प्रत्येक ठेकेदाराचे रंगसुध्दा वेगवेगळे पाहिजेत.

**प्रकरण क्र.१११ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३३, ठराव क्र. १२१)

**ठराव क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२१, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 224.10 | 224.00 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 128.40 | 430.90 |
| एकूण खर्च | 351.50 | 654.00 |
| शिल्लक | 1.00 | 1.00 |

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.११२, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३४, ठराव क्र. १२२)

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२२, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 893.00 | 1277.48 |
| ''अ'' अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 126.38 | 535.48 |
| एकूण खर्च | 1019.38 | 1812.96 |
| शिल्लक | - | - |

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव एकमताने मंजूर करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, आपण ते सादर केलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे विशेष शिक्षण कर म्हणजे मनपा शिक्षण करच ना. मागच्या वेळी आपण जी करवाढ केली होती १ टक्के तेव्हा शासनाने तो ठराव निलंबित केला आणि साधारण महापालिकेमध्ये जानेवारी महिन्यापर्यंत ५० टक्के वसुली झालेली होती. ती फिगर घेतलेली आहे. मनपामध्ये गव्हर्नमेंटने १८ जानेवारीला ठराव निलंबित केला आणि आपल्याकडे ३० जानेवारीपर्यंत पैसे आकारण्याचं बंद झालं. ३० जानेवारीपर्यंत आपल्याकडे ५० टक्के टॅक्स डिपार्टमेंटला वसुल झालेले आहेत. ह्या हेडमध्ये कुठेही ते ५० टक्के वसूल झालेले पैसे दाखवले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब कर आकारणी वाढीव केल्यानंतर महापालिकेने २१ कोटी ५९ लाख रुपये वसुल केलेले होते.

**नरेंद्र मेहता :-**

कधीपर्यंत

**मा. आयुक्त :-**

निलंबन होईपर्यंत.

**नरेंद्र मेहता :-**

२१ कोटी

**मा. आयुक्त :-**

नाही १४ कोटी ५९ लाख.

**नरेंद्र मेहता :-**

आपण सर्वच बोलता की, शिक्षण कराबाबत बोलता.......

**मा. आयुक्त :-**

शिक्षण कर पकडला ना त्याच्यामध्ये

**नरेंद्र मेहता :-**

२७ कोटी ६० लाख केले आहे आपण मी महापालिकेतनं फिगर घेतले.

**मा. आयुक्त :-**

मलप्रवाह, लाभकर ६ कोटी १८ लाख, पाणी पुरवठा लाभ कर ५ कोटी ५१ लाख आणि ९० लाख रु. विशेष शिक्षण कर आणि पाणी पुरवठा लाभ कर असे सगळे मिळून २१ कोटी ५९ लाख आपण वसूली केली होती. त्यापैकी आम्ही परतावा म्हणून दाखवले नाही आणि निलंबन म्हणजे रद्द नाही. अजून ऑर्डर व्हायची आहे. आम्ही फक्त वसुल थांबवली आहे. परतावा प्रोव्हीजन करुन ठेवली आहे. रद्द झाल्यानंतर परतावा करणार.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, विषय असा आहे की, निलंबनच नाही झालं तर तो ठराव मंजूर झाला त्याला पैसे द्यायची गरज नाही असे तुमचे म्हणणे आहे.

**मा. आयुक्त :-**

माझे काही म्हणणे नाही. माझे म्हणणे असे आहे की, निलंबन म्हणजे रद्द नाही हे एकच वाक्य आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तुमचे म्हणणे मी दुसऱ्या ॲंगलनी बोलतो मी गृहीत धरतो की ठराव निलंबित झाला रद्द झाला नाही.

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंटकडून जी चर्चा झाली ते निलंबन केलेले आहे. त्याबद्दल महासभेने स्वतःचे म्हणणे मांडलले आहे. त्यासाठी सुनावणी होणार आहे. आता ठराव निलंबित केलेला आहे. निलंबीत केलेला असला तरी ठराव अस्तित्वात नाही किंवा रद्दही नाही. ज्या पोझिशन मध्ये आहे त्या पोझिशनमध्ये आम्ही वसुली थांबवलेली आहे आणि ज्यांची वसुली केलेली आहे. त्यांच्या पुढच्या बिलात जर शासनाचा निर्णय झाला तर रिफंड करणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, तो निर्णय नाही झाला तरी करामध्ये आपण ह्यावर्षी बदल केलेला आहे. म्हणजे तो मंजूर झाला तरी आपण नविन ऑलरेडी ठराव केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

पण पाठीमागच्या वर्षाचा निर्णय अजून सुनावणी व्हायची आहे आणि यावेळेला अंडरग्राऊंड ड्रेनेज लाभकर आणि शिक्षण कर १ टक्का आणि प्रॉपर्टी टॅक्स मध्ये २ टक्के वाढ हे तीनच करवाढ ह्यावर्षी केलेले आहे. हे सोडुन एखादं मागच्या वर्षाचं असेल तर ते कन्टीन्यु होईल. पण गव्हर्नमेंटकडून सुनावणी व्हायचे आहे. सुनावणी होऊन निर्णय व्हायचा आहे. निर्णयानंतर पोझिशन होईल ते.........

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, त्यासाठी कुठेतरी प्रोव्हिजन केली पाहिजे. उद्या शासनाने रद्द केल्यानंतर तुमच्या बजेटवर पूर्ण परिणाम होणार आहे. तर त्याची तुट कशी भरणार. मला फक्त शिक्षणावर पुरे आहे साहेब विषय मिक्स करता कामा नये.

**मा. आयुक्त :-**

पान क्र.५१

**नरेंद्र मेहता :-**

कुठला शिक्षणकर........

**मा. आयुक्त :-**

मुळ बजेट.

**नरेंद्र मेहता :-**

आपण मुळ बजेटवर नाही शिक्षण वर चर्चा करतो.

**मा. आयुक्त :-**

शिक्षणचं पार्ट अँन्ड पार्शल आहे ह्यात सगळं इन्क्लुड आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जो शिक्षण कर आकारणी केललेली आहे. बजेटमध्ये जी प्रोव्हिजन केलेली आहे त्याच्यामध्ये शिल्लक द्यायची अमाऊंट आहे. ते आपण प्रोव्हिजन केली नाही. शिक्षण कर आपण प्रोव्हीजन केलेली आहे. तुमचे म्हणणे आहे. ठराव निलंबित आहे रद्द नाही. मग सध्या त्या बजेटमध्ये रिफंड द्यायची प्रोव्हीजन नाही ना.

**मा. आयुक्त :-**

इतर कर व परतावा म्हणून प्रोव्हिजन करुन ठेवलेले आहे ना.

**नरेंद्र मेहता :-**

किती.

**मा. आयुक्त :-**

अमाऊंट जरी जास्त असली तरी रिॲप्रोप्रिएशन होणार सर्वात महत्वाची बाब तुम्ही लक्षात घ्या. मागच्या वेळेला आम्ही १०९ कोटी सर्व कर मिळून दाखवले होतं आणि आता फक्त ६५ कोटी दाखवतो. पूर्वी जे कराचं बजेट होते ते १०९ कोटीचे होत आणि आता जी कराची रक्कम दाखवली आहे ती ६५ कोटी दाखवली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब मागच्या बजेटमध्ये ५७ कोटी होता.

**मा. आयुक्त :-**

५७ कोटी प्रॉपर्टी टॅक्स पाणपट्टीचा हेड वेगळा.

**नरेंद्र मेहता :-**

पाणीपट्टीचा आता पण वेगळा आहे.

**मा. आयुक्त :-**

वेगळा असून कमी करुन दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही बोललात मागच्या वेळेला १०९ आता ६५ दाखवले तरी तुम्ही मलप्रवाह, शिक्षण सगळ वेगळचं दाखवले आहे. ह्याच्यात समावेश नाही आजपण नाही पहिलंपण नव्हतं.

**मा. आयुक्त :-**

चालु वर्षाचा १ टक्के शिक्षण कर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण बोललात मागच्या वर्षी घरपट्टी कर ६५ च्या ऐवजी १०९ होता. ते आता आपण सांगितले. आपलं असं म्हणण आहे की, त्यामध्ये सगळे समाविष्ट होते. मलप्रवाह, रस्ता लाभ कर जे काही इतर आता तुम्ही ६५ केलेत ना. परंतु जे जे कर लावले ते अजून वेगळेच आहेत.

**मा. आयुक्त :-**

पाणीपुरवठा लाभ कर नाही सात रुपयांचं दहा रु. नाही.

**नरेंद्र मेहता :-**

पाण्याचा विषय कुठे आहे पाण्यामध्ये कशाला घेऊन जाता.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला टोटल सांगितली तुम्हाला शासनाने कर रद्द केला तर परतावा करणार.

**नरेंद्र मेहता :-**

आता प्रोव्हीजन केलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

प्रोव्हीजन केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कुठे आहे दाखवा. परत देण्याची प्रोव्हीजन कुठे आहे. तेच विचारतो. विषय संपला.

**मा. आयुक्त :-**

पान क्र. ५१ – १८ नंबरवर इतर कर व इतर परतावे या खाली साडेतीन कोटी दाखवले आहेत. साडेतीन कोटी प्रोव्हीजन केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ते कशासाठी

**मा. आयुक्त :-**

हेड आहे. हेड असेल तर रिॲप्रोप्रिएशन होणार. शासनाने रद्द केला की लगेच रिॲप्रोप्रिएशन ठराव येणार.

**नरेंद्र मेहता :-**

रिफंडसाठी ना.

**मा. आयुक्त :-**

नाही आता रिफंडसाठी........

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, ते शासनाचं जाऊ द्या. मागच्या वेळेला जो भगवती शर्माने ठराव मांडला की आपला पाणी पुरवठा सुविधा लाभ कर रद्द करा. ते फक्त तुम्ही सहा कोटी घेतलेले आहेत ते तुम्हाला द्यायचे नाही ना. बाकी शासनाचं जाऊ द्या. ते ह्याच्यात दिसत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

लाभ कर आम्ही रिफंड करणार ना. ते रिॲप्रोप्रिएशन करणार.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब, बजेट येताच पहिल रिॲप्रोप्रिएशन

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, ५१ नंबर पानावर परतावा लिहिला आहे ना ते वाचून सांगा ना.

**मा. आयुक्त :-**

सांगितल ना.

**मिलन पाटील :-**

चला विषय संपला.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही म्हणता बजेटपण करायचं आणि रिॲप्रोप्रिएशनला आजच मंजूरी द्यायची.

**मिलन पाटील :-**

५१ नंबर पानावर वाचाना तुम्ही, सर्व लिहलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांना अकाऊंट समजावून सांगतो. पाच हजाराचं बिलं तुम्हाला पाठवलं. पाच हजाराच्या बिलाप्रमाणे तुम्ही भरायला आलात एक हजार अगोदर भरले होते. त्यामुळे पावती जी येणार ती यापूर्वी भरलेले एक हजार त्यांनी रक्कम द्यायची नाही. चार हजार रक्कम देऊन पावती घ्यायची तो जमा होता ना असा होणार यापूर्वी ॲडव्हान्स भरलेले एक हजार आणि आता रोख रक्कम दिलेले चार हजार असं होणार. प्रत्येकांना बिल असेच जाणार निर्णय होईपर्यंत परतावा आम्ही शासन निर्णय झाला की, वजावट करणार.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये शासन निर्णयाचा संबंध कुठे आहे.

**मा. आयुक्त :-**

शासनाने रद्द केलेला.........

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाने ठरवलेले की पाणी लाभ कर रद्द करा.

**मा. आयुक्त :-**

ते आम्ही ॲडजस्टमेंट करणार आता तुम्हाला सांगितले ना.

**नरेंद्र मेहता :-**

एकदा बाजुला तुम्ही म्हणता की, ह्यासाठी आपण साडेतीन करोड प्रोव्हिजन केलेली आहे. विषय असा आहे की, मागच्या वेळेला शासनाने जे काही कर निलंबीत केले. साधारणतः आपल्याकडे २७ कोटी रू. ॲक्सेस आले आहेत. ते २७ कोटी आपल्याला ह्यावर्षी द्यायला लागणार. आयुक्तांचे असे म्हणणे आहे की शासनाने निलंबीत केल तर मंजूर कुठे केल. आपण तुम्ही गृहीत धरल. तरी मागच्या वेळी सभागृहाने घेतलेला निर्णय झाला की पाणी लाभकर रद्द करा पण ते सहा करोड आपल्याक़डे आले ते तरी द्यायचे ना.

**मा. आयुक्त :-**

ज्यांचे लाभ कर वसुल केलेले ते मायनस करून बिल दिल जाईल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब मी इथे बिलाच कुठे बोलतो. मी प्रोव्हिजन बोलतोय.

**मा. आयुक्त :-**

प्रोव्हिजन रिॲप्रोप्रिएशन करणारच आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर साहेब, बिल मायनस करून दिल्यानंतर रिफंडची गरजच नाही ना.

**नरेंद्र मेहता :-**

शहराला पैसे परत नाही द्यायचे का? शासनाने जे ठराव निलंबीत केले के पैसे परत द्यायचे नाहीत का? सभागृहाने जो ठराव केला आहे. पाणी लाभकर रद्द करा ते पैसे परत द्यायचे नाहीत का?

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी माहिती आपल्याला दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेबानी, चुकीची माहिती दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

चुकीची नाही, बरोबर दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब कुठे बरोबर दिलेली आहे दाखवाना. सहा करोड परत फेडीसाठी आहे. साडेतीन करोड फक्त प्रोव्हिजन ठेवली आहे. ओव्हर ऑल २७ करोड परत द्यायचे आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ती तुम्ही बिल बजा करून पाठवाल. रोख तर देणार नाहीत ना.

**(सभागृहात गोंधळ)**

**मिलन पाटील :-**

महापौर साहेब, ह्या सभागृहामध्ये कॉग्रेस आणि राष्ट्रवादीची ५० नगरसेवक आहेत. आमची मेजोरिटी जास्त आहे. आम्हाला जनतेची जास्त काळजी आहे. आता त्याच्यावर स्टे आहे. जनतेचा परतावा असला तर आम्ही परत देऊ.

**नरेंद्र मेहता :-**

इकडे मेजोरिटीचा विषय नाही. बजेटमध्ये रितसर प्रोव्हिजन व्हायला पाहिजे ना. आयुक्त बोलतात की आम्ही रिॲप्रोप्रिएशन करू. म्हणजे आज बजेटपण आणि रिॲप्रोप्रिएशन........

**मा. महापौर :-**

ते होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

झाल्यानंतर.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**निर्मला सावळे :-**

पिठासीन अधिकाऱ्याच्या परवानगीने बोलते. आयुक्त साहेब आपण गेल्यावेळेस शिक्षण विभागामार्फत जे शाळेला गणवेश ठरवले. त्याच पेमेन्ट आतापर्यंत झालेले आहे का? २०१० मध्ये जे गणवेश वाटप केले त्याच पेमेन्ट अदा केले का? त्या विषयावर मला बोलायच आहे. मार्च २०१० मध्ये आपण जो ठराव केला. शिक्षण विभागाचा ठराव झाला ना.

**प्रकरण क्र. ११२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३४, ठराव क्र. १२२)

**ठराव क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२२, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | 893.00 | 1277.48 |
| ‘‘अ’’ अंदाजपत्रकातील हस्तांतरण | 126.38 | 535.48 |
| एकूण खर्च | 1019.38 | 1812.96 |
| शिल्लक | - | - |

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११३, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ “B’’ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३५, ठराव क्र. १२३)

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२३, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| ‘‘महसुल’’ + ‘‘भांडवली’’ + ‘‘असाधारण’’ एकूण जमा | 2883.57 | 1891.00 |
| ‘‘महसुल’’ + ‘‘भांडवली’’ + ‘‘असाधारण’’ एकूण खर्च | 2803.62 | 1884.80 |
| अखेरची शिल्लक | 79.95 | 6.20 |

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**(सभागृहात गोंधळ )**

**मिलन म्हात्रे :-**

फायरब्रिगेडच्या संदर्भात एक ठराव आहे. तो पाठवून देतो, त्याबाबत मी पत्र दिलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर साहेब, आम्ही सभागृहाला माहिती देतो. स्विकारण न स्विकारण आपले काम आहे. मा. आयुक्त साहेब, आता ज्या नविन बसेस येणार आहेत त्याच्यामध्ये साडेपाच करोड आपल्याला राज्य आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून भेटणार आहेत. साडेपाच कोटी प्रस्तावित केले होते की ठेकेदाराच्या माध्यमातून येणार आहेत. आणि अकरा करोड खर्च होणार आहे. इथे १०५० चा फिगर जो दाखवला आहे तो समजला नाही. त्याचा खुलासा करावा की, १०५० कसे आले. दुसरे साहेब अस आहे की मागील वर्षात मी काही फिगर घेतली. १ करोड ३३ लाख आले. म्हणजे मागच्या ज्या ५० बसेस ज्या चालू आहेत त्यामध्ये साडेपाच करोडमधून १.३७ आपल्याकडे आलेले आहेत. त्यानंतर स्टॅण्डींगमध्ये असा एक विषय आणला होता की ठेकेदाराची नेमणूक झाली नाही. तर बसला उशिर होईल म्हणून ते पैसे आपण भरून नंतर घेऊ. त्यावेळेला महापालिकेने साडेपाच करोड भरले ते आपल्याला परत आलेले नाहीत. मग ते साडेपाच कुठे प्रोव्हिजन केली आहे. का कुठे येणार प्लस १.३७ आले ते आणि बसेस अकरा करोडची घेतली आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. चे साडेतीन करोड जे जून बाकी आहे ते कोणी भरले. पहिल ते क्लिअर करा १०५० कसे झाले. ठेकेदारांकडून १०५० चे कसे? १० करोड ५० लाखाचे कॉन्ट्र्यूब्युशन तो कसा देणार?

**मा. आयुक्त :-**

परवाच सेंट्रल गव्हर्नमेन्टकडून इन्फोर्मेशन आली आहे की तीन कोटी १० लाख मंजूर झालेले आहेत ते रिलीज होणार आहेत. ठेकेदारानी अजून आपल्याला ४.९८ दिलेले नाहीत. तीन राज्यानी बसेस घेतल्या नसल्याने म्हणजे एखाद्या वेळेस २५० पैकी त्या बसेस इकडे डायव्हर्ट होणार आहेत. म्हणून ते प्रोव्हिजन करून ठेवलेली आहे. आणि त्यानंतर स्थायी समितीने दुरूस्त केलेले आहेत. ५ कोटी ५० लाखाचे.........

**नरेंद्र मेहता :-**

माझे असे म्हणणे आहे की आपण विषय डायव्हर्शन करतात. माझे दोनच प्रश्न आहेत की आता ज्या आपल्याकडे एक्झीस्टींग बसेस आलेल्या आहेत. त्यात नक्की आपण अकरा कोटी दिले आहेत. आता ठेकेदारीत त्यांचा पण हिस्सा नाही दिला आणि जे.एन.एन.यु.आर.एम. ने मंजूरी दिली पण पैसे दिले नाही. मग ते अकरा कोटी भरले कोणी.........

**मा. आयुक्त :-**

अकरा कोटी आपण भरले.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्हाला तो अधिकार कोणी दिला. स्टॅण्डींग कडून तुम्ही साडेपाच कोटीची मंजूरी घेतली होती. आणि ठेकेदार भरत नाही म्हणून आपण भरू या. मग उरलेले साडे तीन तुम्ही कसे काय भरले.

**मा. आयुक्त :-**

सेंट्रल गव्हर्नमेंटकडून यायला उशिर झाला ना?

**नरेंद्र मेहता :-**

अस थोड आहे. की उद्या तुम्ही बोलाल की, भुयारी गटार योजना आहेत. गव्हर्नमेंट पैसे देत नाही आपण भरून टाकू.

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेन्टचे पैसे परवा आले ना.

**नरेंद्र मेहता :-**

हा विषय एकदम चुकीचा आहे. आपण इकडे बजेट करतो. त्याप्रमाणे तरतुद करतात. परिवहनचे पैसे परिवहनमध्ये गेले पाहिजेत. परिवहनचे पैसे परिवहनमध्ये डायवर्ट करायला पाहिजे. परिवहनमध्ये महासभेची मान्यता घेऊन नंतर करायला पाहिजे. आज ज्या बसेस चालू आहे अकरा कोटी रू. तिकडे १००टक्के आपला फंड आहे.

**मा. आयुक्त :-**

शंभर टक्के नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ते पाच टक्के पण दिले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

१ कोटी ३७ लाख रू. राज्य आणि केंद्र शासनाचे आले. त्यानंतर ३ कोटी १० लाख काल आले.

**नरेंद्र मेहता :-**

मला काय बोलायचे आहे ते आपल्याला बरोबर समजले आहे. आपण जे पैसे भरले ते चुकीने भरलेले आहेत. आपल्याला अधिकार नसताना........

**मा. आयुक्त :-**

रोडवर गाड्या आल्या नाहीत तर अनुदान देणार नाहीत.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब सभागृह होता. तुम्हाला एखादा जे.एन.एन.यु.आर.एम. कडून फंड येत नाही. तुम्हाला हेडचे फंड वापरायचा तुम्हाला रिॲप्रोप्रिएशन मान्यता गरजेची आहे. दुसरे म्हणजे १०५० कसे झाले. महापौर उपमहापौर सांगा आपण. एखाद्या जे.एन.एन.यु.आर.एम. च्या फंडाचे पैसे दुस-या याच्यात आहे तर मान्यतेची आवश्यकता नाही.

**मा. आयुक्त :-**

स्टॅण्डींगची रिॲप्रोप्रिएशन घेतली ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब तुम्हाला माहितच आहे जर साडेतीन कोटीसाठी स्टॅण्डींग रिॲप्रोप्रिएशन द्यायला लागली तर झाल मग.......

**मा. आयुक्त :-**

त्याच हेडखाली होते ना.

**नरेंद्र मेहता :-**

ऑडिटर आहेत, मुख्य लेखाधिकारी आहेज त्यांना सांगा. स्टॅण्डींगचा तो अधिकार आहे का? दुसर म्हणजे १०५० कसे झाले.

**मा. आयुक्त :-**

पुढच बजेट.

**नरेंद्र मेहता :-**

पुढच बजेट म्हणजे २०१३ काय उडवा उडवीची उत्तर देता.

**मा. आयुक्त :-**

२०११-१२ ची प्रोव्हीजन करून ठेवली.

**नरेंद्र मेहता :-**

ठेकेदार तुम्हाला १० कोटी ५० लाख का देणार. त्याच ५ कोटी ५० लाखाच कॉन्ट्रयुबेशन येणार आहे. १०५० का देणार? ५ करोड एक्स्ट्रा का देणार?

**मा. आयुक्त :-**

५ करोड ५० लाख ठेकेदाराकडून येणार.

**नरेंद्र मेहता :-**

प्रिटींग मिस्टेक असेल तर प्रॉब्लेम नाही.

**मा. आयुक्त :-**

ते करेक्शन करून घेऊ।

**नरेंद्र मेहता :-**

करेक्शन म्हणजे ५ कोटी ५० लाख करणार का? आता हे पाच कमी केले ना तुमचा पूर्ण बजेटच लॅब्स झाला तर तुम्हाला पूर्ण चेंज करायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

चेंज होणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, पाच करोड कुठून आणणार?

**मा. आयुक्त :-**

प्लस झाले.

**नरेंद्र मेहता :-**

परिवहन मध्ये आत पाच करोड कमी येणार. तुमचा बजेट आता कुठे व्हॅलिड राहणार?

**मा. आयुक्त :-**

एक आकडा चेंज झाला की सगळे चेंज होते........

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, पाच करोड आवक कमी झाली तर जावक पण कमी करायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

कमी करून दाखवू ना.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब एक विषय असा आहे सभापती साहेब हा बजेट तुम्ही मान्यतेला आणलेला आहे. हा ठराव नाही. आता तुम्ही ज्यावेळेला ५ करोड कमी करता तेव्हा सभागृहाला कुठले पाच करोड खर्च कमी करता तो निर्णय घ्यावा लागेल. नाहीतर हा बजेट अस्तित्वात राहणार नाही. कुठेतरी कमी करायला लागेल. पाच इन्कम कमी झाली.

**जुबेर इनामदार :-**

मूळ बजेटमध्ये कमी करतो.

**दिपक सावंत :-**

ह्याच्यात खर्चाची बाजू आहे. ते ट्रान्सपोर्ट फंड क्रिएट केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सिकिंग फंड

**दिपक सावंत :-**

३ करोड ३० लाख रूपये.

**नरेंद्र मेहता :-**

तरी २ करोड राहणार.

**दिपक सावंत :-**

आणि ४ 'ब' इंधन, वंगण, स्पेअर पार्ट परिवहन व्यवस्था विभागाचे.........

**नरेंद्र मेहता :-**

३.२५ मध्ये अजून २ कमी करणार ठिक आहे. हे पाच करोडचे झाले अशी माझी सुचना घ्यावी. साहेब आता ह्या बजेटमध्ये परिवहन कडून माहिती घेतली. परिवहन मध्ये एक ट्रान्सपोर्ट मॅनेजर, दोन शिपाई आणि एक क्लार्क चारच लोक काम करतात. त्यासाठी एवढी सगळी कागद रंगवायची हा फंड तो फंड ऑफिस

ॲक्सवेन्स,ॲडमिनिस्ट्रेशन ॲक्सवेन्स, स्टेशनरी ॲक्सवेन्स त्याची गरज नाही ना त्याचा का आता रोलच राहिला ना. फक्त चार अधिका-याना वर्षाला १० लाख खूप झाले. एवढा मोठा बजेट करायची तरतूद नाही. तर पुढच्या वर्षी सभागृहाला निवेदन राहिल की आता जेवढ राहील आहे. तेवढच खर्च कराव. बाकी स्टेशनरी, प्रिन्टींग हे करायची आवश्यकता नाही.

**अरूण कदम :-**

महापौर साहेब, परिवहनच्या बजेटमध्ये ९ नंबर पानावर इंधन, वंगन, स्पेअर पार्ट खर्च दाखवला आहे. इंधन, वंगण, स्पेअर पार्टचा खर्च ३ कोटी २५ लाख तो कशासाठी दाखवला आहे. ती प्रोव्हीजन कशासाठी केली आहे.

**दिपक सावंत :-**

महानगरपालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस सेवा चालवण्याचा निर्णय घेतल्यानंतर पूर्वीच्या ज्या हायरिंग करून बसेस चालवल्या जात होत्या. त्या बसेसचा मुदतपूर्व ठेका रद्द करून नविन ठेकेदाराला दिल्या. २००५ ते २०१० पर्यंत जे अग्रीमेंन्ट बनवल होत त्या ॲग्रीमेन्टमध्ये ४ 'ब' मध्ये इंधन लुबीकन्ट आणि स्पेअर पार्ट याचे जे चार्जेस आहेत तो शासनाचा होलसेल प्राईज इंडेक्स आहे त्या अनुषंगाने जे व्हेरीएशन येईल ते त्याला पे करायच होत. ते जे व्हेरिएशन आहे ते २००५ पासून आतापर्यंत. आपण प्रत्येक वर्षी त्या ठेकेदाराला काही अमाऊन्ट पे केलेली आहे. आणि तो जो प्रस्ताव आहे त्याचा ठेका रद्द केल्यानंतर ते संपूर्ण पाच वर्षामध्ये ते व्हेरिएशन येते ते आपल्याकडे सादर केल होत. आपल्याकडे टेक्निकल स्टाफ नसल्यामुळे पुण्याला सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्टला आम्हाला हा प्रस्ताव छाननी करून द्या म्हणून पाठवला आहे. त्याच्या तपासणीनंतर मग पुढचा निर्णय घेण्यात येईल.

**अरूण कदम :-**

साहेब, माझी माहिती अशी आहे की, त्या डब्लु.पी.आय. इंडेक्सच्या तरतुदीनुसार तुम्ही त्या कॉन्ट्रॅन्टरला ६० ते ६५ लाख जास्त दिलेले आहेत. जर तुमच्याकडे त्याचा रिपोर्टच नाही तर आणखी द्यायचे कशावरून समजता.

**दिपक सावंत :-**

साहेब, ह्याच्यामध्ये २००५ पासून २०१० मध्ये आपण त्याला प्रत्येक वर्षी ठराविक रक्कम दिलेली आहे.

**अरूण कदम :-**

ती रक्कम तुम्ही कुठल्या रिपोर्टप्रमाणे दिली. कोणता इंडेक्स वापरला.

**दिपक सावंत :-**

पहिल्या वर्षी ऑडिटर बॅलेन्सशीट वापरला.

**अरूण कदम :-**

डब्लू.पी.आय. प्रमाणेच देणे गरजेच आहे काय?

**दिपक सावंत :-**

हो.

**अरूण कदम :-**

परंतु, त्याप्रमाणे दिलेले नाही त्याला लमसम दिलेले आहे. आणि माझ्या माहितीप्रमाणे त्याला ६०-६५ लाख ऑलरेडी जास्त दिलेले आहेत. तर रिकव्हरी ते तुम्ही बजेटमध्ये दाखवल पाहिजे. तुम्ही हा विषय २२/१२/२०१० च्या महासभेला आणला होता. तो तुम्ही विषय पटलावरून गायब केला आणि महासभेत तो विषय पुन्हा आणला नाही. मी त्यावेळेलाही पत्र दिले होते. त्याच उत्तर अजूनपर्यंत दिलेले नाही. माझ्या माहितीप्रमाणे ही जी प्रोव्हिजन केली आहे ती रद्द करून दुस-या हेडमध्ये वळवा. आत्ताच ५ कोटी कमी झाले आहेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, आपल म्हणण बरोबर आहे की प्रत्येक बिलातून थोड-थोड जस इंडेक्स वाढेल तसे दिले आहे. परंतु दिलेली रक्कम आणि द्यावयाची रक्कम हे केंद्रशासनाचा इंडेक्स तपासून घेऊन ते द्यावे लागते किंवा लागत नाही. त्याची तपासणी करायला पाठवल होत. आपल्या म्हणण्याप्रमाणे मा. महापौर साहेबांनी विषय घेतला होता ही वस्तुस्थिती आहे. परंतु ती तुमच्या लोकांनी तपासली आहे. ते शासकिय संस्थेकडून तपासून घ्यावे. आणि तपासून आल्यानंतर महासभेपुढे ठेवावे असा निर्णय झाल्यामुळे तो विषय त्यावेळेला रद्द केला. म्हणजे घेतला गेला नाही. आता आम्ही पुण्याला इंडेक्स तपासायलाच पाठवला आहे. त्यामध्ये इंडेक्स तपासायला त्याला द्यायची रक्कम तेवढीच पाठवली नाही. आम्ही दिलेली पण दाखवलेली आहे. त्याच्याकडून चेक करून आल्यानंतर पेमेन्ट करावे लागते किंवा लागत नाही. ते त्यांच्या निर्णयावर ठरणार आहे.

**अरूण कदम :-**

साहेब, जर त्याला आपण जास्त रक्कम दिलेली असेल.

**मा. आयुक्त :-**

जास्त दिली आपण म्हणतो. परंतु त्यांना तपासायला पाठवल्यानंतर दिलेली रक्कम आणि द्यायची रक्कम दोन्ही तपासायला पाठवले ना?

**अरूण कदम :-**

जास्त दिलेली असेल तर काय मग ती रिकव्हर कशी करणार.

**मा. आयुक्त :-**

रिकव्हर होऊ शकेल.

**अरूण कदम :-**

कशी?

**मा. आयुक्त :-**

बॅक गॅरेन्टी असेल ना.

**अरूण कदम :-**

त्यांचा कॉन्ट्रक्ट रद्द केला.

**मा. आयुक्त :-**

त्यांचा कॉन्ट्रक्ट रद्द केला पण पूर्ण कॅन्सल केला नाही.

**अरूण कदम :-**

त्यांची बॅक गॅरेन्टी तुमच्याकडे आहे का?

**मा. आयुक्त :-**

बॅक गॅरेन्टी आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पान क्र. १० वर त्यामध्ये परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज............

**मा. महापौर :-**

आता सचिवाना बोलायला परवानगी दिलेली आहे आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब बेरीज चुकलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मी तुम्हाला परिवहनच्या विषयावर सुचना दिलेली आहे.

**शरद पाटील :-**

बेरीज चुकली आहे अस ते सांगत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमची बेरीज चुकलेली दाखवतो.

**नगरसचिव :-**

नरेंद्र मेहता ह्याची सुचना आहे. ठराव क्र. ११३ मध्ये सुचना ठेकेदार कॉन्स्ट्रब्युशन एक कोटी ५० चे ५०० लाख करावे. व सिकिंग फंड ३ कोटी कमी करावे व २ कोटी इंधन स्पेअर पार्ट मधले कमी करावे अशी सुचना मांडलेली आहे.

**मा. महापौर :-**

ही सुचना फेटाळण्यात आलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता आयुक्तानी सांगितल कमी करतो. आता आयुक्तानी जबाब दिला. आम्ही बोललो नाही. आयुक्त साहेबांनी सांगितल की ५ करोड तिकडे चुकून लावले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ती सुचना फेटाळली तर ते पाच करोड ॲडजेस्ट कुठे करणार.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्ताच्या शब्दाचा मान ठेवा. सुचना घ्यायची नसेल तर पाच करोड कुठून आणणार ते सांगा.

**प्रशांत पालांडे :-**

महापौर साहेब, सुचना फेटाळली तर साडेपाच कोटी ॲडजेस्ट कुठे होणार?

**मा. महापौर :-**

अगोदर सांगितले आम्ही याच्यावर विचार करतो. आपल्याकडे येणे जास्त आहे...........

**नरेंद्र मेहता :-**

येणेच नाही तर खर्च कसा करणार.

**मा. महापौर :-**

येणे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

येण आहे तर मा. आयुक्तानी सांगावे. आता आयुक्तांनी सांगितले प्रोसिडिंगमध्ये आले आहे की पाच कोटी चुकून आले आहेत. आणि मा. स्टीवन मेन्डोन्सा सभापतीनी पण सांगितले आहे की ते आम्ही कमी करू.

**मिलन म्हात्रे :-**

या अर्थसंकल्पामध्ये त्या ठेकेदाराची तरतुद करता का? अर्थसंकल्पाची तरतुद करता. तरतुद कुठली चालली आहे. या तरतुदीवर काय करतुद करणार की नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जे सांगितल ती सुचना आम्ही.........

**मिलन म्हात्रे :-**

सगळे फेटाळत बसले आहेत. एखाद्या बजेटमध्ये तुम्ही भांडता ना. मागच्या स्टॅण्डिंगला ज्या चुका केल्या आहेत त्या तरी सुधरावा. आजच्या ३१ तारखेनंतर तुम्हाला सुधरवायला चान्स नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, तो विषय क्र. ११२ की ११३ आहे ते बघून घ्या. आपण जे परिवहनचे वाचले ते ११२ की ११३ आहे.

**नगरसचिव :-**

११३ आहे.

**नरेंद्र मेहता :-**

११३ मध्ये सूचना आहे. सचिव साहेब, ठराव जे होतात ते एखाद्या विषयावरून की तुमची चुकच झाली आहे. आयुक्त साहेब जे आपण सांगितल आहे तेच केले आहे. बाकी काही केल नाही.

**दिपक सावंत :-**

आपली जी सुचना क्रमांक आहे ती दुरूस्त करून घेतो.

**नरेंद्र मेहता :-**

तो तुमचा अधिकार नाही तो त्यांचा अधिकार आहे. सुचना मान्य करायचा अधिकार तुमचा नाही तो महापौराना अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही सुचना मांडली आहे. सचिव साहेब ह्याच्यात बदल होता कामा नये.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ “B” अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३५, ठराव क्र. १२३)

**ठराव क्र. १०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यकालीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२३, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २०१०/२०११ सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे

**आकडे लाखात**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| “महसुल” + “भांडवली” + “असाधारण” एकूण जमा | 2883.57 | 1891.00 |
| “महसुल” + “भांडवली” + “असाधारण” एकूण खर्च | 2803.62 | 1884.80 |
| अखेरची शिल्लक | 79.95 | 6.20 |

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील अनुमोदक श्री. नरेंद्र मेहता यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

ठेकेदार कॉन्ट्र्युब्युशन १०५० चे ५०० लाख करावे. सिंकींग फंड ३०० करोड कमी करावे व २ करोड इंधन स्पेअर पार्टमध्ये कमी करावे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११०, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ "अ'' + "क'' + "अंध व अपंग'' + "महिला बालकल्याण'' + "JNNURM'' + "P'' अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३२, ठराव क्र. १२०)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बेरीज चुकलेली आहे.

**मा. महापौर :-**

माणसाला चुक करण्याचा आणि सुधारण्याचा अधिकार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चार-चार ऑडिटर बसले आहेत.

**मदन उदितनारायण सिंग :-**

महापौर साहेब, ते दुरूस्त करा ना?

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२०, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ चे रक्कम रु. ५ लाख ३५ हजार शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१०-११ चे सुधारीत अंदाज व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक** **(आकडे लाखात)**

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ" + "ब" + "क" + "वृक्षप्राधिकरण" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" एकूण जमा | 56506.70 | 102513.57 |
| अंदाजपत्रक "अ" + "ब" + "क" + "वृक्षप्राधिकरण" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" एकूण खर्च | 47381.52 | 102508.22 |
| **अखेरची शिल्लक** | **9125.18** | **5.35** |

**मिलन पाटील :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, ह्याच्यात माझी एक सुचना होती.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅन्डीगच्या लोकांना अधिकार नाही. आम्ही स्टॅन्डीगला असताना आम्हाला बोलू देत नव्हते.

**भगवती शर्मा :-**

या लेखाशिर्षाखाली महानगरपालिकेने JNNURM / BSUP नगरोत्थान अभियान / राजीव आवास योजना / हॉस्पीटल इमारत / टाऊन पार्क, शाळा इमारती, प्रभाग कार्यालय इमारती करीता कंन्सल्टंट नेमलेले आहेत. तसेच डबल एन्ट्री सिस्टीम सुरु करण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तेचे Valuation तयार करणे इत्यादी कामे करण्यासाठी सुध्दा कंन्सल्टंट नेमले आहेत. त्यांचे बिल देण्याकरीता मा. स्थायी समिती सभेत रु. ५.०० कोटी तरतुद करण्यात आली होती. परंतु सदर आकडा बजेटच्या पुस्तकात दाखविला गेला नाही. तरी सदर दुरस्ती करण्यात यावी. अशी त्या बजेटमध्ये सुचना केली होती. परंतु ती सुचना अंकामध्ये आलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

परंतु ह्यांनी सुचना कधी केली होती?

**मा. महापौर :-**

भगवतीजीनी जी सुचना केली आहे त्या सुचनेसह मंजुर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे फायनल बजेट प्रिंटआऊट कसे झाले?

**जुबेर इनामदार :-**

सन २०१०-११ या वर्षात जैलसपार्क सबवे, मार्केट बांधकाम या लेखाशिर्षात रकमा खर्च न झाल्याने सदर रकमा बांधकाम विभागातल्या इतर लेखाशिर्षाखाली पुर्नविनियोजन करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०११ पर्यंत अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे अशी मी या ठरावमध्ये सुचना मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बजेटची पुस्तिका पानानुसार घेणार की कसे?

**नरेंद्र मेहता :-**

आता मी जी सुचना करतो ती खरोखर प्रशासनाकडून चुका झालेल्या आहेत. आपण तो विषय व्यवस्थित समजून घ्या. पान क्र. १० वर............

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यानंतर पान क्र. १७ वर मला बोलायच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

पान नं. १० वर एकूण कर्ज जे परतफेड करायचे आहे. त्याची रक्कम आहे.

**मा. महापौर :-**

श्री. भगवती शर्मा आणि श्री. जुबेर इनामदार यांनी ज्या सुचना केल्या त्या सुचनासहित ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे सुधारित व २०११-१२ चे मुळ ''अ'' + ''क'' + ''अंध व अपंग'' + ''महिला बालकल्याण'' + ''JNNURM'' + ''P'' अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०३/२०११ नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १३२, ठराव क्र. १२०)

**ठराव क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरण पत्र, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२०, दि. ०७/०३/२०११ विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ चे रक्कम रु. ५ लाख ३५ हजार शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सन २०१०-११ चे सुधारीत अंदाज व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक** (आकडे लाखात)

| तपशिल | 2010/11 (सुधारित अंदाज) | 2011/12 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ" + "ब" + "क" + "वृक्षप्राधिकरण" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" एकूण जमा | 56506.70 | 102513.57 |
| अंदाजपत्रक "अ" + "ब" + "क" + "वृक्षप्राधिकरण" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" एकूण खर्च | 47381.52 | 102508.22 |
| **अखेरची शिल्लक** | **9125.18** | **5.35** |

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. मिलन पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदक श्रीम. उमा सपार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

सन २०१०-११ या वर्षात जैलसपार्क सबवे, मार्केट बांधकाम या लेखाशिर्षात रकमा खर्च न झाल्याने सदर रकमा बांधकाम विभागातल्या इतर लेखाशिर्षाखाली पुर्नविनियोजन करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०११ पर्यंत अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा अनुमोदक श्री. शशिकांत भोईर यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

या लेखाशिर्षाखाली महानगरपालिकेने JNNURM / BSUP नगरोत्थान अभियान / राजीव आवास योजना / हॉस्पीटल इमारत / टाऊन पार्क, शाळा इमारती, प्रभाग कार्यालय इमारती करीता कंन्सल्टंट नेमलेले

आहेत. तसेच डबल एन्ट्री सिस्टीम सुरु करण्याकरीता महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तेचे Valuation तयार करणे इत्यादी कामे करण्यासाठी सुध्दा कंन्सल्टंट नेमले आहेत. त्यांचे बिल देण्याकरीता मा. स्थायी समिती सभेत रु. ५.०० कोटी तरतुद करण्यात आली होती. परंतु सदर आकडा बजेटच्या पुस्तकात दाखविला गेला नाही. तरी सदर दुरस्ती करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे जाहिर करण्यात येत आहे.

**(सभा संपल्याची वेळ १२.४५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**